कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

सुधारीत बांधकाम परवानगी

क्र. कडोंमपा/नरवि/बांप्र/कवि/ ८०-३८

कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

दिनांक :- २३/५/९१

श्री./श्रीमती :- दशरथ कान्हा सस्ते व इतर

कुलमुखत्यारपत्रक :- श्री. विलास सावरमल जैन

वास्तुशिलपकार :- श्री. सतिष डावरे, कल्याण

विषय :- सि.स.नं. — स.नं. ६९/२, ७७ हिस्सा ८/१४, ८/३ ~~प्लॉट नं.~~

मौजे - गांधारे येथे बांधकाम करण्याच्या मंजुरीबाबत.

संदर्भ :- १) आपला दि. ८/१२/९० रोजीचा श्री सतिष डावरे वास्तु. यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र. /

~~२) अंतरिम मंजुरी आदेशपत्र क्र. कडोंमपा/नरवि/बांप्र/कवि/~~

~~दि~~

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्र. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम ४५ नुसार सि.स.नं. — स.नं. ६९/२, ७७ हिस्सा ८/१४, ८/३ ~~प्लॉट नं.~~ मौजे - गांधारे मध्ये १३५४८-०० चौ.मी. क्षेत्राच्या भुखंडावर, २४९२०-०० चौ.मी. चटई क्षेत्राच्या भुखंडाचा विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक ८/१२/९० च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे ~~तळमजला, स्टील्ट, तळमजला, पहिला मजला, दुसरा मजला, तिसरा मजला, चौथा मजला, पाचवा मजला, सहावा मजला, सातवा मजला, आठवा मजला, नववा मजला, दहावा मजला, अकरावा मजला, बारावा मजला, तेरावा मजला,~~ रहिवासी, दुकाने, ~~ऑफिस~~, वाडे-भिंतीच्या इमारतीच्या बांधकामाबाबत, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे. इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार रहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे. इमारत ए → स्टील्ट (पै) + ७ मजले

इमारत बी → स्टील्ट (पै) तळमजला (पै) + ७ मजले

इमारत सी → स्टील्ट (पै) + ७ मजले

इमारत डी → तळमजला +

१) हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी मंजूरीपत्राचे नूतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नूतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजनेचे अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.

३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.

४) ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर बांधकाम अगर विकास करण्यास हक्क देत नाही.

५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशाप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटीप्रमाणे करावे.

६) वाडेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिलपकाराने, मंजूर नकाशाप्रमाणे वाडेभिंतीचे व जोत्याचे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे. व न.र. या कार्यालयाकडून तपासून घेऊन "जोता पूर्णत्वाचा दाखला" घेण्यात यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.

७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.

८) इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिलपकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहिल.

९) नकाशांत दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्वपरवानगीशिवाय बदल करु नये तसेच प्लॉटच्या हद्दीत इमारती भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.

१०) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतुदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहिल

THE SEAL OF THE SUB-REGISTRAR ★ KALYAN-2 ★

दुय्यम निबंधक कल्याण-२